ॐ

# अध्याय अकरावा

१ पार्थ तेधवां वदे, ‘माधवा, कृपा मजवरी करुनी
अध्यात्माचें गुह्य थोर जें सांगितलें विवरोनी १
तेणें विलया गेला माझा मोह-रूप अंधार
आणि जाहला भक्त-वत्सला स्वरूप-साक्षात्कार २
‘मी अर्जुन हा स्व-जन आणि हा पर-जन’ हा अभिमान
धरुनी चित्तीं देखत होतों भ्रांति-रूप दुःस्वप्न ३
त्वां मज आत्म-ज्ञान देउनी सदया जागृत केलें
म्हणुनी कळलें रूप एकलें तुझें चि विश्वीं भरलें ! ४

२ भूत-मात्र तें जन्म पावतें कसें प्रकृतिपासून
आणि मागुतें विलीन होतें कसें तींत संपूर्ण ५
तें हि परिसिलें जें सांगितलें तुवां कमल-पत्राक्षा
तेविं ऐकिला अभंग महिमा तुझा अनंत अलक्षा ६

३ तसा चि असमी जसें वर्णिसी रूप आपुलें देवा,
तशा तुला प्रत्यक्ष पहावा अशी आवडी जीवा ! ७
तुझें ईश्वरी विश्व-रूप जें श्रुति-स्मृतींतें न कळे
तें देखाया यादवराया, उतावीळ हे डोळे ८
४ म्हणुनी योगेश्वरा, दाखवीं अव्यय रूप तुझें तें
जरी मानिसी असें पात्र मी त्यातें हि पहायातें. ९
तुजसि गोकुळी मारूं आली जरी विष-स्तन-पानें
तरी दिलें त्वां तिये पूतने सायुज्याचें देणें ! १०
दुर्जन वैरी तारिले तरी कंस आणि शिशुपाळ
सौंगडी भले भोळेभाळे उद्धरिले गो-पाळ ११
भक्त-जन भला त्वां बैसविला अढळ-पदीं ध्रुव बाळ
तेविं दयाळा, तुवां तारिला पातकी अजामीळ १२
असा माधवा, विश्व-बांधवा उदार तूं सर्वत्र
म्हणुनी देवा, न देखसी तू दानीं पात्रापात्र १३
कृपा-सागरा, विश्व-रूप तूं दाविशील लवलाहीं
परंतु मातें पहावया तें सामर्थ्य तसें देईं !' १४
५ अशी विनवणी परिसुनी झणीं बोले श्रीभगवंत
'पाहें पार्था, शत-सहस्त्रशः रूपें माझीं येथ १५
भिन्न भिन्न ते प्रकार असती विविध वर्णही ज्यांत
नानाकारीं नटलीं सारीं माखुनियां तेजांत १६

कितीक असती उंच ठेंगणीं बहुत कृश तशीं स्थूळ
मुकीं बोलकीं क्षुब्ध विवेकी सावध तैशीं बरळ १७
कितीक काळीं तशीं सावळीं रक्त-वर्ण तेजाळ
हिरवीं पिवळीं निळीं जांभळीं श्वेत-चंद्र-चोखाळ १८
सतेज सुंदर तशीं मनोहर गोंडस अति सुकुमार
महा-भयंकर मस्त दांडगीं तैशीं विकटाकार १९
६ अष्ट वसू हे पार्था, पाहें तसे मरुद्गण सर्व
आदित्य इथे रुद्र ते तिथे आणि अश्विनी देव २०
एकैकांच्या अंग-प्रान्तीं सुर-सिद्धांच्या सृष्टी
अदृष्टपूर्व प्रकटल्या पहा आश्चर्यांच्या पंक्ती ! २१
७ माझ्या देहीं चराचर पहा जगत् सकल एक-स्थ
आज लाभलें पार्था, तुजसी इच्छा दर्शन येथ २२
८ परी पहाया न च समर्थ तूं चर्म-चक्षूनें मातें
दिव्य दृष्टि ही घेवोनि पहा मदैश्वर्य-योगातें !' २३
९ संजय सांगे ऐकें राजा, असें बोलुनी तेथें
श्रीभगवंतें रूप थोरलें दाखविलें पार्थातें २४
सचंद्र तारा-समूह लोपे जसा सूर्य-तेजानें
प्रपंच-रचना गिळिली देखे तशी विश्व-रूपानें २५
वृत्ती सगळ्या तदा मुरडल्या सुखें अंतरात्म्यांत
सर्वथैव तो जिथे संपतो मन-बुद्धीचा प्रांत २६

स्वरूप-साक्षात्कार अंतरीं प्रथम पावला पार्थ
प्रत्यक्ष अतां विश्व-रूप तें देखे तो चि यथार्थ २७

१० अनेक वदनें अनेक नयनें तशीं दर्शनें बहुत
अद्‌भुत दिसती अर्जुनाप्रति त्या चि विश्व-रूपांत २८

विश्व-रूप जें नटलें सहजें नाना दिव्याभरणीं
आणि राहिलें दिव्य आयुधें नाना सज्ज करोनी २९

देव आपण चि अंग जाहला आपण चि अलंकार
शरीर आपण जीव हि आपण हात आणि हत्यार ३०

११ किती शोभती मुकुटावरतीं पुष्प-गुच्छ-संभार
तेविं सुगंधी दिव्य फुलांचे गळ्यांत रुळती हार ३१

दिव्य गंध-अनुलेपन करुनी पीतांबर परिधान
सर्व-व्यापी अनंत राहे असा नवल-परिपूर्ण ! ३२

नेत्र उघडितां मूर्तिमय असें दिसे तया सर्वत्र
आणि अंतरीं तैसें चि, जरी मिटुनी घेई नेत्र ३३

अनावर मुखें समोर देखे म्हणुनी फिरवी पाठ
तों चि ती तशी श्रीमूर्तीशीं तिकडे हि पडे गांठ ! ३४

देखें राजा, अद्‌भुत ऐसें अनुग्रहाचें करणें
अर्जुनासवें विश्व आघवें कसें व्यापिलें तेणें ३५

१२ सहस्त्र-सूर्य-प्रभा जरि पहा एकवटे आकाशीं
तरी सर्वथा ती तुळे चि ना विश्व-रूप-तेजाशीं ३६

१३ नाना भेदें भरलें जग जें तें चि सर्व एक-स्थ
तिथें पाहिलें तदा पांडवें विश्व-रूप-देहांत ३७

१४ आणि तत्क्षणीं आश्चर्य-भरें तया स्तब्धता आली
घर्म-बिंदुनीं तशी डवरली तनु रोमांचित झाली ३८

मुळीं न बोले जागृत झाले अष्टहि सात्त्विक भाव
गळा दाटला आणिक सुटला कंप शरीरा सर्व ३९

विवर्णता ती येइ त्याप्रति आनंदाश्रु हि नयनीं
किती लोटती, होइ सर्वथा तन्मय वृत्ति निदानीं ! ४०

तरी मागुता सावध होतां पार्थ हात जोडोनी
देवांच्या त्या देवा बघुनी बोले शिर नमवोनी. ४१

१५ ‘स्वर्ग-लोक हा अखिल सुरांसह तुझ्या शरीरीं पाहें
भूत-समूहासह तुजमाजीं मर्त्य-लोकही आहे ४२

ब्रह्मा कमलासनीं विधाता आणिक सर्व ऋषी ते
देखें देवा, देहीं चि तुझ्या दिव्य सर्पही येथें ४३

१६ अनेक वक्त्रे अनेक उदरें अनेक बाहू नेत्र
लेउनी इथे अनंत-मूर्ते राहिलासि सर्वत्र ४४

तुजवीण रिता श्रीभगवंता, अणुमात्र नसे ठाव
विश्व सकल हें व्यापुनी स्वयें राहिलासि तूं देव ४५

जिकडे तिकडे चहूंकडे तूं स्वयंभू हृषीकेशा,
अंत मध्य तव मूळ हि न दिसे विश्व-रूप विश्वेशा, ४६

१७ इथे श्रीहरी, दिसे तव शिरीं किरीट तो हि तसाच
करिं चक्र-गदा धरिसि मुकुंदा, तूं तेजो-निधि साच ४७
न पाहवे तुजकडे तेज तें पसरे अपरंपार
प्रदीप्त अग्नी-तरणीसम तूं तेजःपुंज अपार ४८
१८ तूं चि अक्षर ब्रह्म-तत्त्व तें अससी परम ज्ञेय
श्रेष्ठ आश्रय-स्थान जगाचें तेविं तूं चि अक्षय्य ४९
श्रीभगवंता, मानीं त्राता तुज शाश्वत धर्माचा
तूं नित्य नवा पंचविसावा 'पुरुष' सनातन साचा ५०
१९ तुज मूळ नसे मध्य न च असे तुला तेविं ना अंत
अनंत बळ तें तुझें श्री-पतें, अनंत तुजसी हात ५१
प्रदीप्त अग्नि तें चि मुख तुझें चंद्र-सूर्य हे नेत्र
तूं तापविसी जगत् स्व-तेजें तुज पाहें सर्वत्र ५२
२० तुवां व्यापिलें अंतर सगळें द्यावा-पृथिवीमधलें
तुझें थोरलें रूप एकलें असे दशदिशीं भरलें ५३
अत्यद्भुत हें तुझें पाहुनी उग्र रूप भगवंता,
भयें ग्रासिलें व्याकुळ झालें त्रि-भुवन बघतां बघतां ५४
जोंवरी न तें दृष्टी पडतें रूप अगम्य अनंता,
तोंवरी चि ते विषय गोमटे बहुत वाटती चित्ता ५५
परंतु आतां तुझें देखतां विश्व-रूप हें थोर
विषयीं विटला जीव जाहला भेटायासि अधीर ५६

पुढें चि देखे परी न च शके मिठी द्यावया तुजसी
मागें जावें तरी पडावें पुनरपि त्या भव-पाशीं　५७

असें तळमळे त्रि-भुवन सगळें झालें कासावीस
रूप थोरलें पहावयाची फिटली सारी हौस !　५८

२१ सुर-संघ किती प्रवेश करिती हे तुजमाजीं येथें
तसे चि कोणी हात जोडुनी प्रार्थिती भयें तूतें　५९

म्हणती, 'देवा, धांव माधवा, मोह-सागरीं बुडतों
पाव श्रीहरी, त्वरित उद्धरीं शरण सर्वथा येतों　६०

विषय वेढिती अम्हां अडविती स्वर्ग आणि संसार
पतित-पावना, दुजा तुजविना कोण पाववी पार ?' ६१

सिद्ध महर्षी-संघ इच्छुनी सदा विश्व-कल्याण
परोपरीनें तुज आळविती करुनि तव यशोगान　६२

२२ तुज कंसारे, असुर हि सारे यक्ष आणि गंधर्व
तसे अश्विनी-कुमार दोन्ही पितर मरुद्‌गण सर्व　६३

रुद्र साध्य-गण आदित्य वसू आणिक विश्वेदेव
कसे पाहती विस्मित होती सिद्ध-समूह सदैव　६४

२३ अनेक वदनें अनेक नयनें अनेक मांड्या पोटें
हस्त पाद बहु कराल दाढा तुझें रूप हें मोठें　६५

असें पाहुनी उठे त्रि-भुवनीं एक चि हाहाःकार
विश्वाधिपते, सहजें भय तें मज हि वाटतें फार　६६

२४ अनेकवर्णी रूप तुझें हें आकाशातें भिडलें
उघडे जबडे तप्त तांबडे विशाळ ऐसे डोळे ६७

बघुनी तेजा केशवराजा, व्यथित जाहला जीव
धैर्य गळालें स्वास्थ्य लोपलें येऊं दे तुज कींव ६८

शरीर गेलें जावो चि भलें मला न आशा त्याची
परंतु आतां वाटे चिंता माझ्या चैतन्याची ६९

साक्षात्कारें जरी विरालें जीव-रूप चैतन्य
गुरु-शिष्य असा संबंध कसा उरेल मग अन्योन्य ! ७०

२५ प्रळयानळसम कराल-दंष्ट्रा-युक्त मुखें विक्राळ
पाहुनियां दिङ्मूढ जाहलों तूं चि अतां सांभाळ ७१

श्रीदेवेशा, जगन्निवासा, करीं विश्व-कल्याण
प्रसन्न होईं मजसीं देईं सुख आणि समाधान ७२

२६ अहा ! कसे हे कौरव येथें कुमार धृतराष्ट्राचे
सवें आपुल्या सकल घेउनी नृप देशोदेशींचे ७३

भीष्माचार्य द्रोण गुरु तसा सूत-कुमार उदार
आणि आमुच्याकडील हि किती नामवंत रण-शूर ७४

२७ पहा चालले वेगें सगळे तुझ्या चि भक्ष्य-स्थानीं
भयानक तुझीं मुखें युक्त जीं बहु कराल दाढांनीं ७५

किती अडकलीं दाढांखालीं शिरें रगडुनी गेलीं
पीठ जाहलें जसें तयांचें देखतसें ह्या कालीं ! ७६

२८ घेती वेगें जलौघ सारे जसे सागरीं धांव
तुझ्या पेटत्या मुखीं धांवती तसे वीर हे सर्व ७७

२९ पतंग वेगें उड्या घेउनी आगींत जसे मरती
लोक हि सारे तसे त्वन्मुखीं वेग-भरानें शिरती ७८

३० असा सत्वरीं सर्वतोपरी समस्त लोकां गिळुनी
जळत्या वदनीं ओंठ चाटिसी कसा जिभा फिरवोनी ७९

सर्व-व्यापी प्रभो, तुझी ती प्रखर दीप्ति अनिवार
तेजें व्यापी सकल जगातें देई ताप अपार ८०

३१ होसी देवा, कोण केशवा, उग्र रूप कां धरिलें
मज सांगावें प्रसन्न व्हावें म्हणुनी चि तुला नमिलें ८१

विश्व-कारणा, उत्कंठित मी असें तुला जाणाया
न च ये ध्यानीं ही कां करणी तुझी अशी यदु-राया !' ८२

३२ श्रीकृष्ण म्हणे, 'जाण वाढलों लोकांतक मी काळ
गिळावयातें सकळां येथें प्रवृत्त मी तेजाळ ८३

त्वां न च वधिले तरि ते सगळे नष्ट जाहले मानीं
दळांत दोन्ही जे जे जमले योद्धे युद्धार्थ रणीं ८४

३३ तरी भारता, ऊठ तूं अतां साधीं विमल यशातें
उपभोगीं हें समृद्ध ऐसें राज्य जिंकुनी अरितें ८५

बघ धनंजया, आधीं चि ययां वधिलें मी ह्या ठायीं
अतां सर्वथा तूं परं-तपा, निमित्त केवळ होईं ! ८६

३४ भीष्म-जयद्रथ-कर्ण-द्रोणादिकां सकल वीरांतें
मीं चि मारिलें तें दाखविलें तुजसी पार्था, निरुतें ८७
अतां किरीटी, तूं हे निवटीं झुंजतां न तुज दोष
सोडीं भय तें रणीं अरींतें जिंकिशील निःशेष !’ ८८
३५ संजय सांगे कृष्ण-वाक्य हें असें परिसुनी तेथें
हात जोडिले भगवंतातें कांपत कांपत पार्थें ८९
भयें-विस्मयें कंठ दाटला भरुनी आले डोळे
मान लववुनी वंदन करुनी तया पुन्हां तो बोले ९०
३६ म्हणे, ‘केशवा, पाहुनी तुझ्या कीर्तीचा उत्कर्ष
सर्वथा बरें ! अनुराग-भरें जगा जाहला तोष ९१
भयें ग्रासिले राक्षस सगळे सैरावैरा पळती
नमस्कारिती तुज श्री-पति सुर-सिद्धांच्या पंक्ती ९२
३७ विश्वाधिपते प्रभो, असे ते नमितील न कां तुजसी ?
तूं चि तत्त्वतां वरिष्ठ कर्ता विरंचीहुनी अससी ९३
तूं चि अनंता, अक्षर; जगता तूं चि आश्रय-स्थान
सद्सद् असुनी तूं चि त्याहुनी पलीकडील निधान ९४
३८ आदिदेव तूं पुराण आत्मा श्रेष्ठ निधान जगाचें
तूं चि सर्वथा वेद्य हि वेत्ता परं-धाम तूं साचें ९५
महद्ब्रह्म जें तें कल्पान्तीं तुजमाजीं सामावे
अनंत-रूपा, विश्व आघवें तुवां व्यापिलें देवें ९६

३९ वायु अग्नि तूं यम हि वरुण तूं तूं चि शशांक तसाच
सर्व देव तूं प्रजापती तूं तूं प्रपितामह साच ९७

काय एक तूं नव्हसी नससी कवण्या ठायीं देवा
अससी जैशा तशा तुज असो नमस्कृति जगज्जीवा ९८

परम दयाळा सहस्त्र वेळां असो तुज नमस्कार
नमो नमस्ते अनंत-मूर्ते पुनरपि वारंवार ९९

४० पुढून तुजसी नमस्कार तो तसा असो मागून
प्रत्यंगाप्रति तुज नमस्कृति तूं चि सर्व संपूर्ण ! १००

अनंतवीर्या, जगीं भरुनियां राहिलासि सर्वत्र
अमित-विक्रमा, अपार महिमा तुझा नितांत पवित्र १०१

स्तुती नाठवे मज न राहवे तेविं निवांत हि देवा
विश्वात्म तूं विश्व हि तें तूं असें चि ये स्वानुभवा १०२

४१ असा नेणुनी तुला मानुनी सौंगडी चि निःशंक
'गड्या मुकुंदा', अशी कितीदा तुला मारली हाक १०३

बरोबरीनें अविनीतपणें किती घातला वाद
प्रमाद झाले किती हातुनी तसे स्नेह-संवाद १०४

४२ कसा खेळतां चाले थट्टा विनोद उठतां बसतां
तुझ्या चि शय्येवरी झोंपतां किंवा भोजन करितां १०५

घडे चि सर्वांसमक्ष अथवा एकांतीं अवमान
मज सर्वस्वीं क्षमा करावी मी तों जाण अजाण ! १०६

४३ अपरिमिता तूं पिता जगाचा परम पूज्य गुरु-राज
तुझ्या चि पोटीं सकल हि सृष्टीं हें अनुभविलें आज १०७
जोड न कोणी तुला कोठुनी मग तुझ्याहुनी श्रेष्ठ
उपमा देवा, तव प्रभावा नसे तिन्ही लोकांत १०८
४४ स्तवनीय अशा तूतें ईशा, लोटांगण घालुनियां
म्हणुनी नमुनी करीं विनंति प्रसन्न हो प्रभुराया १०९
सखा सख्याचे प्रिय प्रियाचे अपराध करी सहन
पिता मुलाचे तसे चि माझे तुवां क्षमावे पूर्ण ११०
४५ मज अवलीळा तुवां चि डोळां दाखविलें हें रूप
सौख्य-सोहळा असा भोगिला झाला तोष अमूप १११
सर्व-व्यापी अपूर्व निरुतें विश्व-रूप हें होय
परंतु मन तें व्याकुळ होतें अजुनी भय न च जाय ११२
वाटे चित्तीं द्यावी चि मिठी बोलाव्या गुज-गोष्टी
परी सर्व तें अशक्य येथें म्हणुनि जीव हा कष्टी ११३
अनंत वदनें तुझीं कुणाशीं घडे बोलणें आतां
विश्व-रूप तूं तुजसी भेटूं कसा बरें भगवंता ११४
प्रसन्न होईं पुनरपि घेईं रूप सावळें सगुण
जगज्जीवना, असे प्रार्थना अशी चि तुजलागून ११५
४६ सहस्त्र-बाहो, तसा पुन्हा हो चतुर्भुज गदाधारी
अनंत-मूर्ते, तसें मागुतें चक्र धरीं तें स्व-करीं ११६

किरीट घालीं दृष्टि निवाली विश्व-रूप भोगून
कृष्ण-रूप तें पहावयातें उत्कंठित मी जाण. ११७

४७ वदे श्रीहरी, 'असे तुजवरी प्रसन्न पार्था, नित्य
म्हणुनी तूतें निज-सामर्थ्यें रूप दाविलें सत्य ११८

विश्वात्मक जें अनंत सहजें तेजोमय जें आद्य
न च आजवरी कुणी पाहिलें तुजवीण दुरासाद्य ११९

४८ वेदाध्ययनें यज्ञाचरणें अथवा देउनि दानें
पढुनी शास्त्रें करुनी कर्में किंवा उग्र तपानें १२०

दर्शन माझें असें नव्हे जें विविध साधनांजोगें
तेंहि तत्त्वतां तुज दाखविलें पार्था मी चि निजांगें १२१

४९ घोर थोरलें रूप हें भलें बघुनी अंतःकरणीं
विमूढ-भावें-व्यथित न व्हावें तुवां भय असें धरुनी १२२

झालें सहजें दर्शन माझें म्हणुनि धन्यता मानीं
अमृत-सागरीं बुडाला तरी मरेल कधि कां कोणी ? १२३

उग्र भासलें तरि हें चि भलें दृढ बुद्धि अशी ठेव
विश्व-रूपता ही चि सर्वथा नित्य-सुखाची ठेव ! १२४

चरे डोंगरीं गाय परि घरीं वांसराकडे ओढ
तसें मदनुसंधान राखुनी सुखें सगुण-सुख जोड १२५

तरि धनंजया, भय सांडुनियां ठेवीं चित्त निवांत
पुनरपि पाहें पूर्व-रूप हें प्रिय जें तुज अत्यंत.' १२६

५० संजय सांगे असें बोलुनी वासुदेव-भगवंतें
मग दाखविलें पुन्हां आपुलें सगुण रूप पार्थातें १२७
उग्र-दर्शनें भ्याला म्हणुनी त्या उदार यदु-नाथें
धीर द्यावया तया मागुतें सौम्य रूप धरिलें तें १२८
तदा पूर्ववत् कुरु-क्षेत्र तें तसें चि सकल ही गोत
अर्जुन देखे रथीं सारथी तसा चि तो श्री-कांत. १२९
५१ आणिक बोले, 'तुझें सांवळें सौम्य मानुषी रूप
पाहुनी असें पुन्हां होतसे चित्तीं हर्ष अमूप १३०
मज निर्भयता अतां सर्वथा भानावरतीं आलों,
कृपा मजवरी 'तुझी श्रीहरी सर्वतोपरी धालों.' १३१
५२ माधव बोले, तुवां पाहिलें विश्व-रूप हें माझें
बहु दुर्लभ तें सुर हि इच्छिती सदा पहायातें जें १३२
५३ दर्शन माझें जसें जाहलें तुला सहज भक्तीनें
तसें न होतें यज्ञें दानें तपें न वेदाध्ययनें १३३
५४ मिळे सागरा अखंड-धारा जशी जाह्नवी जगतीं
तसा भक्त तो मला भेटतो अनन्य-भावें अंतीं १३४
मिळतां अनलीं इंधन जैसें अग्नि-रूप तें होतें
साक्षात्कारीं तेविं संपतें देव-भक्त हें नातें १३५
मजसी मिळतां नुरे तत्त्वतां 'मी-तो' ऐसें द्वैत
म्हणुनि राहे मी चि होउनी मज माजीं चि निवांत ! १३६

अनन्य-भक्ति करी भारता, तो चि तत्त्वतां मातें
असा जाणतो आणि पाहतो समरस होतो तेथें १३७

५५ मदर्पण करी कर्में सारीं मत्पर जो मद्भक्त
निःसंग जगीं निर्वैर असा पावे मज निभ्रांत.' १३८

असे ज्यांत विश्व-रूप-दर्शन योग तो ।
भावार्थ गीता-अध्याय एकादश निवेदिला ॥ ११ ॥